• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८७ • बुधवार,दि.१७ जानेवारी २०२४ •RNI-MAHMAR/2021/80074•Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रुपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 287• Wednesday 17 Janewari 2024 •RNI-MAHMAR/2021/80074• Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24• Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■





बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# महाराष्ट्राची जनता गद्दारांना थारा देत नाही

मुंबई । वृत्तसंस्था

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी महापत्रकार परिषद घेऊन विधानसभा अध्यक्ष आमदार अपात्रता प्रकरणात दिलेला निकाल कसा चुकीचा होता याबाबतचे दावे केले. त्यासोबतच त्यांनी भाजप अन् एकनाथ शिंदे यांच्यावरही हल्लाबोल केला. उद्धव ठाकरेंच्या पत्रकार परिषदेतील महत्वाचे मुद्दे पाहूयात. सुप्रीम कोर्टाकडून आता शेवटची न्यायाची अपेक्षा आहे. लोकशाहीचा मूलभूत घटक असणाऱ्या जनतेच्या न्यायालयात आपण आलो आहोत. सरकार कोणाचंही असलं तरी, सत्ता ही सामान्य जनतेचीच असली पाहिजे. माझं आव्हान आहे. नार्वेकरांनी, मिंध्यांनी माझ्यासोबत जनतेमध्ये यावं आणि तिथं सांगावं शिवसेना कुणाची? मग जनतेने ठरवावं कोणाला पुरावा, गाडावा की तुडवावा. शिवसेना जर तुम्ही विकली असाल; तर मी जिथे जिथे जातो, तिथे तिथे शिवसैनिक माझ्यासोबत कसे? राज्यपालांना विनंती करतो, एक अधिवेशन पुन्हा बोलवा आणि मिंध्यांना सांगतो; विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास ठराव आणा, मी तुम्हाला पाठिंबा देतो. हाकला त्यांना! व्हीपचा अर्थ आहे चाबूक! चाबूक लाचारांच्या हातात शोभत नाही. शिवसेनाप्रमुखांच्या आणि शिवसैनिकांच्या हातात शोभतो! आपण निवडणूक आयोगावर एक केस करायला पाहिजे.






आपण शपथपत्र आणि प्रतिज्ञापत्र लिहिली होती. मग सरकारने गाद्या पुरवल्या नाहीत, म्हणून निवडणूक आयोग त्यांना गाद्या समजून झोपलंय का? मला सत्तेचा मोह नव्हता; एका क्षणात मी शासकीय निवासस्थान सोडलं आणि एका क्षणात मुख्यमंत्री पदही सोडलं. राज्यपालांनी जे अधिवेशन बोलवलं होतं, ते असंविधानिक होतं. आपल्या देशात लोकशाही जिवंत राहणार की नाही, सुप्रीम कोर्ट अस्तित्वात राहणार, की लवाद त्याच्या डोक्यावर बसणार; हे पाहण्याची ही लढाई आहे. सुप्रीम कोर्टाचा आदेश सर्वोच्च मानायचा, की लबाडाचा आदेश सर्वोच्च मानायचा; ही लढाई उद्या होणार आहे. आमच्या पात्र अपात्रतेचा निर्णय माझी जनता घेईल; ते म्हणतील त्या दिवशी मी घरी बसेन.पण लोकशाही जिवंत रहाणार आहे की नाही? कोर्ट फाशीची शिक्षा सुनावतं; पण प्रत्यक्ष अमलात आणतो जल्लाद! त्या जल्लादाचं काम ह्या लवादाला दिलं होतं. सुप्रीम कोर्टाने तयारी करून दिली, पण लवाद म्हणतो; ह्यांना फाशी कशी देऊ? ह्यांच्या जन्माचा दाखलाच नाही. पण कोर्टाने जन्माचा दाखला तपासण्यास नाही तर, जो गुन्हा केलाय त्याबद्दल त्याला फाशी द्यायला सांगितलं होतं. जर १९९९ नंतर शिवेसनेची घटनाच अस्तित्वात नव्हती तर २०१४ साली मला कशाला मोदींना पाठिंबा द्यायला पाठवलं होतं? २०१९ साली कशाला सहीसाठी बोलावलं होतं? तिकडेच ढोकळ्यावाल्याची सही घ्याची होती ना असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. मिधे-फिंद्यांना कुणी पदं दिली, माझं मत हे अवैध असेल तर अमित शाह कशाला मातोश्रीवर आलेले असाही उद्धव ठाकरे यांनी प्रश्न विचारला. शिंदे म्हणाले की उद्धव ठाकरे हे शिवसैनिकांना घरगड्यासारखे वागवतात. मग असा कोणता घरगडी आहे जो हेलिकॉप्टरने शेती करायला जातो असा प्रश्नही त्यांनी विचारला. जे पी नड्डा म्हणाले होते की, देशात एकच पक्ष राहणार आहे. फक्त भाजप पक्ष राहणार असल्याचे ते म्हणाले होते आणि त्याची ही सुरवात आहे. एका पक्षाचा अध्यक्ष उघडपणे सर्व पक्ष संपवून जाणार असल्याचे सांगत आहे. हे खूप घातक असून, लोकशाहीच्या खुनाची सुरुवात झाली आहे.



## मोदींना पंतप्रधान बनवून तुम्हाला काय मिळणार?

मुंबई । वृत्तसंस्था

नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनवण्याचा चंग बांधलेल्या लोकांनी, सामान्यांच्या पदरात काय, पडणार आहे याचे उत्तर आधी द्यावे असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. शहरातील व्यापाऱ्यांच्या मेळाव्यात त्या बोलत होत्या. इंदापूर शहर व्शायापारी संघाचे अध्यक्ष भरत शहा या वेळी उपस्थित होते. शासकीय विश्रामगृहात हा मेळावा झाला. सुप्रिया सुळे म्हणाल्या, काहीतरी बदल घडेल असे वाटल्याने मागील काळात व्यापारी वर्गाने सर्वाधिक ताकद भाजपला दिली. मात्र ऑनलाईन व्यापार व कर लादून भाजपने व्यापा-यांचे नुकसान केले आहे. देशात आपल्याला विरोधकच नको असे भाजपला वाटते. ४८ खासदारांपैकी ३८ खासदार भाजपचे व त्यांच्या मित्रपक्षांचे आहेत. मात्र त्यातील एकानेही शेतक-यांच्या, व्यापा-यांच्या समस्या, कांदा, दुध दर अथवा सामान्यांच्या अधिकारांबाबत आवाज उठवला का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आम्ही मोदींना पंतप्रधान बनवणार आहोत असे काही लोक म्हणतात. मोदींना पंतप्रधान बनवून तुम्हाला काय मिळणार आहे. तुम्हाला गुंडाळून ठेवतील. काय होतंय ते कळणार ही नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या सहका-याच्या दाओस दौ-यावर ही त्यांनी खरमरीत टीका केली. त्या म्हणाल्या की, परदेशात गुंतवणूक करण्यासाठी जातातच. मुख्यमंत्री, त्यांचा एखादा सचिव व गुंतवणूक क्षेत्राशी संबंधित असे चारचौघे गेले तर ठीक झाले असते. परंतु एकदम ४७ जण गेले आहेत. ३५ कोटी परदेशवारीला वाया घालवायचे की अंगणवाडी सेविकांना द्यायचे हे तुम्हीच ठरवा. हा विरोधाला विरोध नाही, त्यांच्या धोरणाला विरोध आहे, असे सुळे यांनी स्पष्ट केले.

## मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेण्यात येणार

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची मागणी सतत मनोज जरांगे यांच्याकडून करण्यात येत आहे. दरम्यान, याबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला असून, याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे. मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांची दोन वेगवेगळ्या पद्धतीने गट केले जाणार आहे. किरकोळ गुन्हे आणि गंभीर गुन्हे अशी यादी तयार केली जात आहे. यातील किरकोळ गुन्हे तात्काळ मागे घेण्यात येणार असून, यासाठी पोलिसांकडून माहिती घेण्यात येत असल्याची माहिती सरकारकडून देण्यतत आली आहे. मराठा समाजाच्या कुणबी नोंदी सापडले असून, त्यांच्या वंशावळी शोधण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. मराठवाड्यात जुन्या नोंदी सापडताना अडचणी येत आहे. बऱ्याच ठिकाणी कागदपत्र गहाळ झाली आहे. मात्र, एका एका जिल्ह्यात ३० ते ३५ लाख कागदपत्रांची तपासणी करण्यात आली आहे. मनोज जरांगे यांचे आंदोलनाचे हे यश आहे. या सर्वांची माहिती आम्ही मनोज जरांगे यांना देणार आहोत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २४ लाख, जालन्यात २१ लाख, परभणी जिल्ह्यात १ कोटी ९४ लाख कागदपत्रांची पाहणी करण्यात आली. ३३-३४ चे नमुने तपासले जात नव्हते. मात्र, आतापर्यंत ३१ लाख ३३ हजार ४६० एवढे ३३-३४ चे नमुने तपासण्यात आले आहेत. त्यामुळे कुणबी नोंदी सापडण्याचा आकडा वाढत चालला आहे. त्यामुळे गावागावात कुणबी नोंदी सापडत आहे. तर, मराठवाड्यात आतापर्यंत ३१ हजार ५७६ नोंदी मिळाल्या असून, १२ हजार प्रमाणपत्र वाटप करण्यात आल्याची माहिती सरकारकडून सांगण्यात आली आहे.

## कुणबी जात प्रमाणपत्रासाठी अधिसूचना निघणार

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रासाठी शासन आणखी तीन अधिसूचना काढणार आहे. त्यामुळे सगेसोयऱ्यांच्या संदर्भानुसार त्यांनाही प्रमाणपत्र मिळेल. तसेच भूमी अभिलेखकडील ३३/३४ नुसार असलेली इसमवारी, खातेवारी नमुना, पोलिस पाटील व इतर नोंदीच्या अनुषंगाने प्रमाणपत्र देण्याची पध्दती ठरेल. एक-दोन दिवसांत निघणाऱ्या अधिसूचना मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांना देण्यात येतील. असे आ. कडू यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले. तत्पूर्वी त्यांनी विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड यांची भेट घेऊन सप्टेंबर ते आजवर विभागात तपासलेले पुरावे, आढळलेल्या नोंदी, दिलेले प्रमाणपत्र याचा आढावा घेतला. प्रशासकीय कामाबाबत समाधानी नाही, मात्र नोंदी शोधणे हे काम सोपे देखील नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## संभाजीनगरमध्ये भरती प्रक्रियेतील पेपरफुटीच्या विरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार

छत्रपती संभाजीनगर : तलाठी भरतीसह वेगवेगळ्या नोकर भरती परीक्षा तसेच सारथी आणि महाज्योती फेलोशिप पात्रता परीक्षांत पेपर फुटी प्रकरणांमुळे दहा-दहा तास अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. त्या प्रकरणाची चौकशी 'एसआयटी'मार्फत करावी व यापुढे सर्व स्पर्धा परीक्षा खाजगी संस्थांऐवजी 'एमपीएससी'च्या मार्फतच घ्याव्यात, असा एल्गार संतप्त विद्यार्थ्यांनी मंगळवारी क्रांतीचौकात पुकारला. विद्यार्थी कृती समितीच्या वतीने स्पर्धा परीक्षांत होणाऱ्या पेपर फुटी प्रकरणाच्या विरोधात ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात स्पर्धा परीक्षांची तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती फेलोशिप पात्रता परीक्षांची तयारी करणारे हजारो विद्यार्थी सकाळी साडेअकरा वाजेपासून जमा झाले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या संतप्त भावना मांडल्या. तलाठी स्पर्धा परीक्षा पेपर फुटी प्रकरणाची 'एसआयटी'मार्फत चौकशी करुन शासनाने दोषींना स्पर्धा परीक्षा प्रक्रियेतून आजन्म हद्दपार करावे, असा सूर या आंदोलनात निघाला. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी, शेतमजुरांची मुलं स्पर्धा परीक्षेची दहा- दहा तास अभ्यास करीत आहेत. मात्र, ऐन परीक्षांमध्ये काही मंडळी पेपर फोडतात. पैसे घेऊन नोकरी लावण्याचे आमिष दाखवतात, याचा शासनाने शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करावी. मागील पाच- सात वर्षांपासून नोकरीच्या अपेक्षेत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा परीक्षांतील घोटाळ्यामुळे भ्रनिराश होत आहे. अनेकांचे आई- वडिला आपल्या मुलाच्या भवितव्याकडे आस लावून बसले आहेत, त्यांना न्याय मिळण्यासाठी परीक्षा घोटाळे करणाऱ्या समाजकंटकांविरूद्ध शासनाने कठोर पाऊले उचलावीत, दरवर्षी भरती प्रक्रिया राबवावी, फेलोशिपचा पेपर का व कोणी फोडला, याचे स्पष्टीकरण शासनाने द्यावे, अशा भावना मांडली. कांगणे व शिंदे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी तलाठी पेपर फुटी प्रकरणाची चौकशी 'एसआयटी'मार्फत चौकशी करावी, ही परीक्षा 'एमपीएससी'द्वारे घेऊन महिनाभराच्या आत निकाल जाहीर करावा व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

## राज्य सरकारला शेतकऱ्यांचं देणंघेणं नाही

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

देशातील सध्याच्या सरकारला शेतकऱ्यांची आस्था नाही. या देशात उद्योगपतींची कर्ज माफ होतात. पण देशातील लोकांची भूक मिटवणाऱ्या शेतकऱ्यांची कर्ज माफ होत नाही. देशात चुकीची आर्थिक धोरण राबवली जात आहेत. अशी चुकीची धोरणं घेणाऱ्या लोकांना बाजूला केलं पाहिजे असे राष्ट्रवादी पक्षाने म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा तसेच नवनियुक्त ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. अशातच शेतकऱ्यांवर सावकाराने कारवाई करत त्याच्या घराचा लिलाव काढला. या चहुबाजुने आलेल्या संकटामुळे त्या शेतकऱ्यांनी विष प्राशन करून आत्महत्या केली. शेतकऱ्यांचा सन्मान राहला नाही की ते जीव देतात, तीच परिस्थिती आजसुद्धा आली आहे असं त्यांनी सांगितले. तसेच त्या शेतकरी आत्महत्येनंतर रिझर्व्ह बँकेकडून माहिती घेतली की, देशातील किती शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्ज आहे. तर माहिती आली की, ७२ कोटी. यावेळी एका क्षणाचाही विचार न करता ७२ कोटींचं कर्ज माफ करून टाकलं. परंतु आज त्या शेतकऱ्याकडे कुणी ढुंकून पाहत नाही. कंदा उत्पादक, हरभरा उत्पादक शेतकरी संकटात असतानाही त्यांच्याकडे कुणी बघत नाही. मी कृषीमंत्रीपदाची शपथ घेतली आणि अमेरिकेतून धान्य मागविण्यासाठीच्या परवानगीची पहिली फाईल आली. मला ही गोष्ट खटकली. तिथून तीन वर्षात शेतकऱ्यांची परिस्थिती बदलली. मागेल तेवढे धान्य शेतकऱ्यांना मिळू लागले. जगातील १८ देशांना भारत धान्य निर्यात करु लागला. पण आज शेतकऱ्यांकडे ढुंकूनही बघितले जात नाही असं राष्ट्रवादी पक्षाचे म्हणणे आहे.

# २०१८ मध्ये नेतेपदी निवड होताच ठाकरेंच्या पाया पडून घेतला होता आशीर्वाद



**मुंबई । वृत्तसंस्था**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालाविरोधात हा शिवसेना ठाकरे गटाकडून अक्षरश: चिरफाड करण्यात आली. जी घटनादुरुस्ती राहुल नार्वेकर यांच्याकडून नाकारण्यात आली, तीच घटनादुरुस्ती, त्यामधील झालेले ठराव या महापत्रकार परिषदेतून उद्धव ठाकरे गटाकडून सादर करण्यात आले. यावेळी २०१८ मध्ये झालेल्या शिवसेनेच्या राष्ट्रीय कार्यकारणीमध्ये तत्कालीन शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांची नेतेपदी निवड करण्यात आली होती. हा पुरावाच यावेळी सादर करण्यात आला. यावेळी शिंदे यांनी नेतेपदी निवड होताच उद्धव ठाकरे यांचे पाय धरल्याचे दिसून येते. महा पत्रकार परिषदेत यावेळी शिवसेना ठाकरे गटाकडून २०१३ मध्ये झालेल्या शिवसेना राष्ट्रीय कार्यकारिणीमधील ठराव सुद्धा सादर करण्यात आले. यावेळी शिवसैनिक म्हणून राहुल नार्वेकर सुद्धा उपस्थित होते. कार्यकारिणीच्या बैठकीतील ठराव सुद्धा शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी वाचून दाखवले. शिवसेनाप्रमुख ही दैवी संज्ञा केवळ स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंना शोभून दिसते, म्हणून यापुढे पक्षातील कोणत्याही पदाधिकाऱ्याला शिवसेनाप्रमुखी संज्ञा नावापुढे जोडता येणार नाही आणि म्हणूनच शिवसेना प्रमुख संज्ञा गोठवण्यात येत आहे शिवसेना पक्षप्रमुख पद हे शिवसेनेत निर्माण करण्यात येत आहे आणि शिवसेना पक्षप्रमुख हे पक्षाचे अध्यक्ष असतील त्यांची निवड शिवसेना प्रतिनिधी सभा करेल, शिवसेना पक्षप्रमुखांची मुदत पाच वर्षासाठी असेल शिवसेना पक्षातील कार्यकारी अध्यक्ष म्हणजे वर्किंग प्रेसिडेंट हे पद यापुढे रद्द करण्यात येत आहे आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे शिवसेनाप्रमुख म्हणून असलेले सर्वाधिकार शिवसेना पक्षप्रमुख यांच्याकडे सोपवण्यात येत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख हे पक्षातील सर्वोच्च नेते असून त्यांचे पक्षाचे धोरण आणि व्यवस्थापन याबाबतचे निर्णय हे अंतिम असतील पक्ष घटनेच्या आठव्या कलमानुसार करण्यात आलेली कोणतीही नेमणूक शिवसेना पक्षप्रमुख रद्द करू शकतील. शिवसेना पक्षप्रमुखांकडे राष्ट्रीय कार्यकारणी केव्हाही बरखास्त करण्याचे अधिकार असतील. पक्ष घटनेच्या अकराव्या कलमानुसार पक्ष संदर्भातले सर्व अधिकार शिवसेना प्रक्षप्रमुखांकडे असतील. शिवसेना उपनेत्यांची एकूण संख्या ३१ असेल त्यापैकी २१ जागा पक्षांतर निवडणुकीत प्रक्रियेद्वारा प्रतिनिधी सभेच्या माध्यमातून निवडल्या जातील व उर्वरित दहा जागांवर नियुक्ती करण्याचे सर्वाधिकार शिवसेना पक्षप्रमुखांकडे असतील. शिवसेना उपनेते शिवसेना पक्षप्रमुखांच्या निर्देशातील कार्यरत असतील. युवासेनेला शिवसेनेची अंगीकृत संघटना म्हणून मान्यता देण्यात येत आहे. युवासेना व युवासेना प्रमुख यांचा पक्ष घटनेच्या बाराव्या कलमात कामगार आघाड्या व संघटना यांच्यामध्ये समावेश करण्यात येत आहे.

## संपादकीय

# शेतकऱ्यांचे जगणे, जटील प्रश्न?

आजच्या किमतीत शेतमालाची विक्री करने शेतकऱ्याला न परवडणारी आहे. दिवसेंदिवस रासायनिक खतांचे भाव, बी बियाणे- कीटकनाशके व मजुरीचे दर, सतत वाढत राहील्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढविणे, ही कठीण समस्या तयार झाली. हमी भावापेक्षा कमी भावात विक्री होऊ नये अशी केंद्र सरकारने व्यवस्था कां केली नाही ? सर्रास हमीभावाच्या खाली शेतमाल विकल्या जात आहेत. वास्तविक हमीभाव म्हणजे कमीभाव आहेत . आम्हीच बेअक्कल शेतकरी आमदार- खासदार, मंत्र्यांना डोक्यावर घेऊन नाचत आहोत. त्यांचे हार तुरे घालून सत्कार करत आहोत. राज्य व केंद्र सरकारने त्यांना निवडणुकीच्या खर्चासाठी (कमिशन खाण्यासाठी ) विकास कामाच्या नावाने दिलेला तो निधी असतो. राजनीतीसाठी शहरे खुष ठेवण्यासाठी, सरकार शेतकऱ्यांचा बळी घेत आहे. म्हणूनच शेतकऱ्यांच्या जगण्यासाठी शेतीमालाचा भाव,ही एक गंभीर समस्या देश पातळीवर तयार झाली. अयोध्येत राम, शेतात गळतो घाम, अन् भीक नको, घेऊ घामाचे दाम. शेतकऱ्याचे पंचप्राण शरद जोशी म्हणायचे, -- कुत्र्याचे शेपूट सरळ होईल, पण शेतकरी एकत्र येणार नाहीत. शेतमालाच्या भाव वाढीची मागणी करणे ही केंद्र व राज्य शासनाच्या नजरेत कोर्टाच्या व्यवस्थेत अन् जीवनाशक वस्तूच्या कायद्यात तो गुन्हा आहे. शेतकरी हाच गुन्हेगार ठरतो.तरीपण आंदोलने करण्यासाठी मागील काळात लाखांनी शेतकरी रस्त्यावर उतरला,आणि अन्नधान्य उत्पादनात आघाडीवर राहिला , पण सरकारचे भूत डोक्यावर बसेल हे त्याला माहिती नव्हते. शेतीमालाचा भावाचा प्रश्न हा रस्त्यावरचा नाही.अन् तो आंदोलनाचा ही नाही. जनतेतून एक नेता तयार होतो. असेच आतापर्यंत टोपल्याने नेते तयार झालेत,७ सोयाबीन, कापूस, तूरीचे भाव दहा - बारा वर्षात खाली आलेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक धोरणाचा प्रश्न केंद्रातील सत्तेच्या विचाराधीन असलेला विषय आहे. हे प्रश्न पंढरीत पांडुरंग किंवा अयोध्येत राम सोडवणार आहे काय ? जोपर्यंत शेतमाल हा जागतिक बाजारपेठेत जाणार नाही, तोपर्यंत शेतीमालाचे भाव वाढणार नाही . आणि त्यासाठी आयात- निर्यात धोरणे मुक्त असावी . ज्याप्रमाणे केंद्र सरकारने कापूस राज्यबंदी हटविल्यामुळे शेतमाल प्रत्येक राज्यात जाऊ लागला. तसेच केंद्र सरकारने देश पातळीवरील निर्यात बंदी उठवावी व शेतमाल निर्यात होऊन अमेरिका, युरोप, जपान, ब्रह्मदेश, चीन, पाकिस्तान मध्ये गेला तर शेतकऱ्याला शेतीमालाचे भाव वाढवून मागण्याची गरज पडणार नाही. आतापर्यंत आंदोलनात शेतकऱ्यांनी अश्रूधूराच्या नळकांड्या, गोळीबार, लाठीहल्ला, हे सर्व काही सहन केलं परंतु शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटला नाही. अन् तो सत्ताधीशांना सोडवायचा सुद्धा नाही. कारण सरकारला राजनितीच्या गरजेसाठी पिकवणाऱ्या पेक्षा खाणाऱ्याची जास्त काळजी पडली आहे. देशातील मतदान हे खाणाऱ्या वर अवलंबून आहे. शेतीमालाला भाव न देता, शासकीय स्वस्त दवाखाने, गावागावात स्वस्त मालाचे धान्य दुकाने लावून शेतकऱ्यांची बेइज्जती केली. ज्या गावात शेतमाल पिकतो त्याच गावात स्वस्तच असतो,मग स्वस्त धान्याचे दुकान लावण्याची गरज काय ? परंतु सरकारने अजून २/- किलो धान्य व ५००/- महिन्याचे अनुदान देऊन, शेतमजूर आळशी बनविला व शेतकऱ्यांची क्रूर थट्टा केली. आमदार, खासदारांनी, मंत्र्यांनी, मोर्चे काढून तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिली. मग कर्मचाऱ्यांना निवेदने देऊन प्रश्न सुटणार आहे कां ? ते फक्त निवेदने स्वीकारून राज्य व केंद्राला पाठवतात. मग ही गोष्ट राज्य व केंद्राला माहित नाही का ? म्हणजेच हा शेतकऱ्याला चुत्या बनवण्याचा फंडा राज्यकर्त्यांनी वापरला. अन अशा चुत्यागिरीला समाज बळी पडला. म्हणजे जत्रेतला हा सुद्धा एक तमाशा आहे. यापुढे शेतकरी, शेतमजुरांनी अशा मोर्चात सामील होऊन राजकीय पक्षाची फक्त दुकानदारी वाढवू नये. अशा मोर्चात सामील होऊन कधीही शेतमालाचे भाव वाढणार नाहीत ,तर त्यासाठी निर्यात बंदी हटवावी लागेल. जाती, धर्माचे प्रश्नन सोडवण्यापेक्षा आर्थिक धोरनाचे प्रश्न सोडविले तर नक्कीच समाज परिवर्तन होईल, असे चर्चासत्रात श्री धनंजय पाटील काकडे यांनी सांगितले . शरद जोशी म्हणायचे- सरकारचे धोरण, हेच शेतकऱ्यांचे मरण. विद्यमान आमदार, खासदार सरकार चालवीतात तर मग हेच खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. शेतकरी आत्महत्येला तेच जबाबदार आहेत. राजकीय पक्षांचे अनेक निरर्थक विचार डोक्यात घालून( मंदिर, मज्जित, जाती, धर्म , मराठा- ओबीसी हे फक्त निवडणुकीपुरते विषय असतात.) शेतकऱ्यांचा सत्यानाश केला. आतापर्यंत आमदार, खासदार, मंत्र्यांनी, ग्रामगीता प्रचारक आणि कवी, लेखकांनी फक्त शेतकरी दुःखाचा ढोंगाचा पसारा स्टेजवर मांडला. कितीही दुःखाची कवीता गायिली , छान हिशोबाचे लेख लिहिले, तरी सरकारला काही फरक पडत नाही ? शेतकरी आत्महत्येची कारणे आता जनतेच्या लक्षात येत आहे. आयात- निर्यात धोरणामुळे शेतकरी संपवीले जात आहे. गेल्या ७५ वर्षात जी काँग्रेसने धोरणे राबवली तीच भाजपा सरकारने राबवली. जोपर्यंत शेतकरी विरोधी कायदे हे बदलत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांची आत्महत्या सतत वाढणार . मतदाराने आतापर्यंत घराणेशाहीला निवडून पाठविले आमदार- खासदारांनी राजकीय पक्षाची गुलामी व लाचारी स्वीकारली. त्यासाठी शेतकरी संघटनेचे किंवा शेतकरी आर्थिक धोरणाचे विचारवंत आमदार - खासदार निवडून आणणे हेच आता आवश्यक आहे. ज्यांनी आतापर्यंत भ्रष्टाचार केला तेच भ्रष्टाचारी माणसे जर निवडून पाठविले तर पुन्हा भ्रष्टाचार वाढनार आहे, म्हणजेच जो उमेदवार खर्च करणार नाही त्याला निवडून पाठवावे लागेल. राजकारणात बदल झाल्याशिवाय ही व्यवस्था दुरुस्त होणे शक्य नाही. विधान भवन संसद मध्ये आवाज उठणारी आमदार- खासदार नसल्यामुळे ही वस्तुस्थिती आहे. आजचे आमदार- खासदार हे फक्त नापिकी, अस्मानी संकटेया विषयावर बोलतात व निधी मागतात. परंतु शेतमालाचे भाववाढ होण्यासाठी कोणीही बोलत नाही. गेल्या दहा वर्षात सोयाबीनचे भाव सतत तेच ४५०० आहे व सोयाबीन तेलाचे भाव तिप्पट वाढलेत ही वस्तुस्थिती आहे. सरकार औद्योगिक उत्पादित वस्तूचे भाव वाढविते व शेतमालाचे भाव तेच ते स्थिर ठेवते . आवाज उठवीणाऱ्या शेतकरी नेत्यावर कोर्ट केसेस दाखल करते. मागे ३० डिसेंबर २०२३ नाशिक, १ जानेवारी २०२४ पुणे व ६ जाने. २०२४ अमरावती येथे शेतकरी संघर्ष समिती व शेतकरी- वारकरी कष्टकरी महासंघाच्या वतीने सरकारची निर्यात बंदी अन् शेतकऱ्यांची मार्केट बंदी या विषयावर चर्चासत्र झाले. शेतमालाची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीत न करता बाहेर व्यापार पेठेत शेतकऱ्यांनी आपल्या गरजेनुसार करावी. केंद्र सरकारने आयात करून शेतीमालाचे भाव पाडलेत म्हणून निर्यात बंदी उठेपर्यंत शेतकऱ्यांनी अहिंसा व शांततेने चालणाऱ्या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे यांनी जाहीर केले. शरद जोशी म्हणायचे - कृषी उत्पन्न बाजार समिती हे शेतकऱ्यांचे कत्तलखाने आहेत. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आर्थिक धोरणे व्यवस्थित न राबविल्यामुळे आजी- माजी आमदार - खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान जबाबदार आहेत. पुन्हा आता निवडणुकीच्या दौऱ्यात आम्हीच तुमचे तारणहार आहोत,असे हे सांगतील. आता हे तुमच्या कष्टाच्या तिजोऱ्या लुटलेल्या तुम्हालाच वाटणार आहेत. त्यासाठी आता एकच पर्याय आजी - माजी आमदार- खासदारांना गावबंदी हाच एक पर्याय आहे. विचार बदला, आत्महत्या टाळा.

# राज्यात चार दिवस थंडीचे

**मुंबई । वृत्तसंस्था**

उत्तर भारतात आलेल्या थंडीच्या लाटेचा आणि दाट धुक्याचा परिणाम राज्यातील तापमानावर झाला आहे. उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली गेले आहे. पुढील चार दिवस उत्तर महाराष्ट्रासह राज्याच्या अन्य भागांतही थंडीत वाढ होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिमालयीन भागांत पश्चिमेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा प्रवाह कायम आहे. त्यामुळे दिल्लीसह उत्तर भारतात थंडीची लाट आलेली आहे. त्याचा परिणाम म्हणून उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्याही खाली गेले आहे. मंगळवारी औरंगाबादमध्ये ९.२, जळगावात ९.४, नगरमध्ये ९.६, नाशिकमध्ये ९.८ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. पुण्यातही किमान तापमान १०.८ अंश सेल्सिअसवर आले आहे. पुढील चार दिवस हीच स्थिती राहण्याचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानाचा पारा आठ ते नऊ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे, तर राज्याच्या अन्य भागात किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होण्याचा अंदाज आहे. पुढील चार दिवस थंडीत वाढ होण्यासह पहाटे धुके पडण्याचा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## जाहिर प्रगटन

**श्रीमती एस.व्ही. पावसकर दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १२/२०२४**
**लोचनाबाई विरूध्द ज्योती**

ज्यापेक्षा **मयत विनायक तुकाराम मेटे, रा.मौजे राजेगांव, ता.केज, जिबीड** हे दिनांक १४ माहे ०८ सन २०२२ रोजी एम.जी. एम. हॉस्पिटल , कामोठे मुंबई येथे मयत झालेले आहेत. आणि अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी ह्या कोर्टास सदरहू **विनायक तुकाराम मेटे, रा. मौजे राजेगांव, ता.केज, जि.बीड** यांचे मृत्यूनंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ आर.डी. आरसुळ यांचे मार्फत दाखल केला आहे.

**अर्जदार - १) लोचनाबाई भ्र. तुकाराम मेटे, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम, रा. राजेगांव, ता.केज, जि.बीड**
**गैरअर्जदार - १) ज्योती भ्र. विनायक मेटे, वय ५७ वर्ष, धंदा नौकरी, रा. सी. ७०३, व्हीनस बिल्डींग, भक्तीपार्क, आणिक वडाळा लिंक रोड, वडाळा (पु.) अॅटॉप हिल, मुंबई ४०००३७, २) आकांक्षा पि. विनायक मेटे, वय २५ वर्ष, धंदा शिक्षण, रा. सी. ७०३, व्हीनस बिल्डींग, भक्तीपार्क, आणिक वडाळा लिंक रोड, वडाळा (पु.) अॅटॉप हिल, मुंबई ४०००३७,३) आशुतोष पि. विनायक मेटे, वय २१ वर्ष, धंदा शिक्षण, रा. सी. ७०३, व्हीनस बिल्डींग, भक्तीपार्क, आणिक वडाळा लिंक रोड, वडाळा (पु.) अॅटॉप हिल, मुंबई ४०००३७,**

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू **विनायक तुकाराम मेटे, रा. मौजे राजेगांव, ता.केज, जि.बीड** यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज दिनांक ०५ माहे ०१ सन २०२४.**
**पु.ता. २०/०२/२०२४**

कोर्टाचा शिक्का

**व.लिपीक मार्फत ॲड.आरसुळ**

**आदेशावरून. स्वाक्षरीत स. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज**

# अवघ्या काही महिन्यात रेल्वे विभागीय व्यवस्थापकांचे स्थानांतरण

**नागपूर । वृत्तसंस्था**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे व्यवस्थापक (डीआरएम) तुषारकांत पांडे यांचे संभलपूरला स्थानांतरण झाले आहे. या पदाची जबाबदारी आता गुंटकल येथील मनीष अग्रवाल सांभाळणार आहेत. देशातील रेल्वे प्रशासनाचा एक अत्यंत महत्वाचा विभाग म्हणून नागपूर रेल्वे विभागाचे महत्व आहे. नागपूरचा विभाग मध्य आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेशी जुळला असून येथे दोन्ही विभागांची स्वतंत्र कार्यालये आहेत. कोट्यवधींच्या प्रवासी उत्पन्नासोबतच या दोन विभागाला कोळसा, वाहने, सिमेंट आणि लोह वाहतुकीतून कोट्यवधींचा महसुल मिळतो. १० महिन्यांपूर्वी तुषारकांत पांडे यांनी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. मितभाषी आणि सौजन्यशिल अधिकारी म्हणून पांडे ओळखले जायचे. त्यांनी आपल्या कार्यकाळात नागपूर तसेच विभागातील अनेक रेल्वे स्थानकांवर महत्वाची विकासकामे करवून घेतली. नागपूर स्थानकावरील पार्किंग आणि ऑन कॉल टॅक्सी हे दोन अत्यंत महत्वाचे विषय मार्गी लावले. साधारणत: या पदावरील व्यक्तीचा कार्यकाळ दोन वर्षांचा असतो. मात्र, अवघ्या १० महिन्यातच त्यांची बदली झाल्याने उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. गेल्या महिनाभरात रेल्वे प्रशासनाशी संबंधित घडलेल्या काही घटनाही त्यामुळे चर्चेला आल्या आहेत. ५ जानेवारीला गार्ड (ट्रेन मॅनेजर) सुनील नितनवरे यांचे रेल्वे हॉस्पिटलमध्ये निधन झाले. यावेळी संतप्त झालेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणाचा आरोप करून जोरदार आंदोलन केले. त्यामुळे काही वेळेसाठी येथील रेल्वेगाड्यांच्या संचालनावर प्रभाव पडला. तत्पूर्वी किन्नराच्या एका टोळीने पुणे हटिया रेल्वेगाडीत दरोडा घातला. त्याचवेळी कंत्राटदाराकडून पार्किंगच्या नावाखाली वाहनधारकाची लुट केली जात असल्याची तक्रार प्रवासी संघटनेने केली. या प्रकरणांची शिर्षस्थ पातळीवर तक्रारवजा चर्चा झाली असताना सोमवारी मध्यरात्री पाटलीपूत्र एक्सप्रेसमध्ये चिमुकलीवर कोच अटेंडन्सकडून बलात्काराचा प्रयत्न झाला. त्यामुळे रेल्वेच्या नागपूर विभागाकडे चोहोबाजूने लक्ष वेधले गेले. या पार्श्वभूमीवर, आज मंगळवारी विभागीय व्यवस्थापक पांडे यांची संबलपूर विभागाचे व्यवस्थापक म्हणून बदली झाल्याचे तर, ही जबाबदारी आता आंध्र तेलंगणातील गुंटकल येथील मनीष अग्रवाल सांभाळणार वृत्त नागपुरात आले. या संबंधाने रेल्वेच्या अन्य अधिकाऱ्यांकडे चर्चा केली असता त्यांनी 'बदलीचा हा प्रकार रुटीन' असल्याचे सांगितले.

# निवडणूक आयोगावर केस करायला पाहिजे -ठाकरे

**मुंबई । वृत्तसंस्था**

आपण निवडणूक आयोगावर केस करायला पाहिजे, त्यांनी आपल्याला शपथ पत्र आणि १०० रुपयांच्या स्टॅम्पवर प्रतिज्ञा पत्र बनवण्यासाठी कामाला लावलेलं होतं. निवडणूक आयोगाने त्याच काय केलं, एकतर ते स्विकारा नाहीतर त्याचा खर्च किती आला असेल ते पैसे परत द्या,.निवडणूक आयोगाने हा मोठा घोटाळा केला आहे, असा आरोप ठाकरे गटाचे प्रमुखउद्धव ठाकरेयांनी केला. आज ठाकरे गटाने खुली पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रतेवर दिलेल्या निकालाचे विश्लेषण केले. तसेच यापूर्वीशिवसेनापक्षाच्या झालेल्या बैठकांचे व्हिडिओ पुरावेही दाखवले.या बैठकीत बोलताना माजी मुख्यमंत्रीउद्धव ठाकरेयांनी केंद्रीय निवडणूक आयोगासह भाजपवर जोरदार आरोप केले. २०१३ सालच्या शिवसेनेच्या बैठकीत कोण कोण उपस्थित होते ते तुम्ही बघितले आहे. आता ही लोक खोट बोलत आहेत, मला सत्तेचा मोह नाही म्हणून मी त्यावेळी मुख्यमंत्रीपदाचा लगेच राजिनामा दिला, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.पक्षप्रमुखांना सर्वाधिकार देणारी हीच ती बैठक; अनिल परबांनी २३ जानेवारी २०१३ चा व्हिडीओच दाखवलाउद्धव ठाकरे म्हणाले, आता राज्यात असलेले सरकार असंविधानिक आहे. राज्यपालही या कटात सहभागी झाले होते. आपल्या देशात लोकशाही राहणार की नाही हे सर्व जग पाहत आहे. ही लढाई शिवसेनेची नाही, ही लढाई लोकशाहीची आहे. सर्वाच्च न्यायालयाचे वर्चस्व राहणार आहे की नाही, खरतर शिवनेतील निकाल सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या चौकटीत द्यायचे होते, पण तसे झालेच नाही, असा आरोपही ठाकरे यांनी केला.निवडणूक आयोगावर केस करायला पाहिजेउद्धव ठाकरे म्हणाले, आपण निवडणूक आयोगावर केस करायला पाहिजे, निवडणूक आयोगाने आपल्याला १९ लाख ४१ हजार शपथ पत्र आणि १०० रुपयांच्या स्टॅम्पवर प्रतिज्ञा पत्र लिहायला कामाला लावले होते. पैसे सामान्य शिवसैनिकांचे गेले आहेत. ती शपथ पत्रे स्विकारा नाहीतर त्याचे पैसे आम्हाला द्या. निवडणूक आयोगाने त्याच काय केलं. हा मोठा घोटाळा आहे, असा आरोपही ठाकरे यांनी केला.अनिल परबांनी २३ जानेवारी २०१३ चा व्हिडीओच दाखवलायावेळी आमदार अनिल परब यांनी २०१३ च्या बैठकीचे व्हिडीओ दाखवले. यात शिवसेनेतील सर्वाधिकार पक्षप्रमुख यांना दिल्याचा ठराव केल्याचे सांगितले.

# मुलीवर अत्याचार करणाऱ्या तरूणाला जामीन

**नागपूर । वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १३ वर्षीय मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीला जामीन मंजूर केला. आश्चर्यकारक बाब म्हणजे आरोपीला जामीन देताना उच्च न्यायालयाचे न्यायाधीशांनी म्हटलं की, हा बलात्कार नसून दोघांमधील प्रेमसंबंध आहे, लैंगिक संबंध वासनेतून नव्हते तर आकर्षणातून होते. आरोपीला जामीन दिल्यानंतर न्यायमूर्तींनी केलेल्या टिप्पणीवरून वाद सुरू झाला आहे. आरोपीला जामीन देण्याबाबत अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. न्यायमूर्तींनी सांगितले की, मुलीने तिच्या निवेदनात म्हटले आहे की, तिने स्वेच्छेने घर सोडले आहे. ती आरोपीसोबत राहिली, जो २६ वर्षांचा आहे. दोघांनीही त्यांचे प्रेमप्रकरण मान्य केले आहे. यावरून असं दिसते की लैंगिक संबंधाची कथित घटना दोन तरुणांमधील आकर्षणाबाहेर होती आणि तरूणाने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले असे नाही.

# अंदुरे आणि कळसकर आमच्या बरोबर होते हे सीबीआय, जिल्हा न्यायालयाला कळविले होते का?

**पुणे । वृत्तसंस्था**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून झाल्याच्या दिवशी रक्षाबंधन असल्याने भाऊ सचिन अंदुरे आणि ... अंदुरे आणि कळसकर आमच्या बरोबर होते हे सीबीआय, जिल्हा न्यायालयाला कळविले होते का ?पुणे: अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून झाल्याच्या दिवशी रक्षाबंधन असल्याने भाऊ सचिन अंदुरे आणि शरदङ्कळसकर हे आमच्या बरोबर होते ही घटना तुम्ही सीबीआय, जिल्हा न्यायालय किंवा उच्च न्यायालयाला कळविली होती का? असा प्रश्न अंदुरे व कळसकरच्या बहिणींना उलट तपासणी दरम्यान विचारण्यात आला. त्यावर दोघींनी 'नाही' असे उत्तर दिले.मग तुमचा नवरा, वडील यांना तसे करायला सांगितले का? वकिलांना सांगून ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्या असे सांगितलेत का?ङ्गत्यावरही त्या 'नाही 'चं म्हणाल्या, अशी माहिती सीबीआयचे वकील प्रकाश सूर्यवंशी यांनी दिली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून प्रकरणी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, सचिन अंदुरे, शरद कळसकर, ॲड. संजीव पुनाळेकर, विक्रम भावे या पाच जणांवर आरोप निश्चिती करण्यात आली आहे.डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून झाला.त्यादिवशी रक्षाबंधन होते. त्यामुळे रक्षाबंधनाच्या दिवशी आरोपी शरद कळसकर औरंगाबादला तर सचिन अंदुरे अकोल्यात आमच्यासमवेत होते, अशी साक्ष कळसकर आणि अंदुरे यांच्या बहिणींनी न्यायालयात दिली होती. त्यावर सीबीआय वकिलांकडून मंगळवारी (दि.१६) बहिणींची उलट तपासणी घेण्यात आली. तुमचा भाऊ या केसमधून सुटावा अशी तुमची इच्छा आहे का? असा प्रश्न बहिणींना विचारला असता त्यांनी होकार दिला असल्याचेही सूर्यवंशी यांनी सांगितले.या केसची पूढील सुनावणी दि.२४ जानेवारी रोजी होणार आहे. बचाव पक्षाने आणखी एक साक्षीदार पुढच्या सुनावणीदरम्यान हजर करण्याचा अर्ज न्यायालयात केला आहे. औरंगाबादच्या एरिगेशन डिपार्टमेंटचे डेप्युटी इंजिनिअर यांना साक्ष देण्यासाठी बोलावले आहे. हा अर्ज मंजूर करुन घेत त्यांना समन्स काढण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# सीबीएससी शाळांना महाराष्ट्र सरकारचे अनुदान मिळणार -शालेयमंत्री दीपक केसरकर

**नागपूर । वृत्तसंस्था**

राज्यातील अनेक सैनिक शाळांमध्ये राज्य माध्यमिक शिक्षण बोर्डाचा अभ्यासक्रम असतो. पण एनडीएच्या परीक्षांमध्ये सीबीएससीचा अभ्यासक्रम असतो. त्यामुळे आपले विद्यार्थी एनडीएच्या परीक्षांमध्ये पास होत नाहीत. त्यामुळे लवकरच मी नवीन धोरण जाहीर करणार आहे. ज्यामुळे सीबीएससीच्या शाळांना देखील महाराष्ट्र सरकारचे अनुदान मिळणार असल्याची माहिती शालेय मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. नागपुरातील भोसला सैन्य शाळेच्या २५ व्या वार्षिक उत्सवात शालेय मंत्री दीपक केसरकर यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. भोसला सैनिक शाळेने मुलींच्या सैनिक शाळेला परवानगी मागितली आहे. ती परवानगी एका महिन्याच्या काळात मिळेल, असं देखील दीपक केसरकरांनी म्हटलं. जगाला आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ देण्याची क्षमता भारताकडे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी इतर देशातील भाषा शिकाव्या. महाराष्ट्रातील मुलांमध्ये काहीही कमी नाही.मात्र, एक कमतरता आहे, ती म्हणजे कामाचा कमीपणा मानण्याची वृत्ती.परदेशातील मुले कोणतेही काम करण्यासाठी कमीपणा मानत नाही, असं दीपक केसरकर यांनी म्हटलं.

## लोकांना कुणबी प्रमाणपत्र द्या - मनोज जरांगे पाटील

**जालना । वृत्तसंस्था**

सरकारकडेगावपातळीवर यंत्रणा आहे. त्यामुळे नोंदी सापडलेल्या ५४ लाख लोकांना दोन दिवसांत कुणबी प्रमाणपत्र द्यावे. त्यांच्या रक्तनात्यातील नातेवाईकांना कुणबी प्रमाणपत्र वाटावे तरच हा आकडा वाढणार आहे. प्रमाणपत्रच वाटप झाले नाही तर अध्यादेशातील बदलांना अर्थच राहणार नाही, अशी भूमिका मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मांडली. मनोज जरांगे यांनी रक्तनात्यातील नातेवाईक, सगेसोयऱ्यांबाबत सूचविलेल्या बदलांनुसार काढण्यात येणाऱ्या अध्यादेशाबाबत मंगळवारी दुपारी आ. बच्चू कडू, मुख्यमंत्र्यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधून चर्चा केली. १७ आणि १८ तारखेला राज्यभरात शिबिर होणार असून, ग्रामपंचायतींवर नोंदी आढळलेल्यांच्या याद्या डकविल्या जाणार आहेत. ज्यांच्या नोंदी आढळल्या त्यांनी प्रमाणपत्रासाठी रितसर अर्ज केल्यानंतर प्रमाणपत्र वाटप केले जाईल, असे आ. कडूयांनी सांगितले. कुणबी नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्तातील काका, पुतणे आणि भावकी नातेवाईकांना तथा पितृसत्ताक पद्धतीने सगेसोयरे आणि नातेवाईक आहेत असे शपथपत्र पुरावा म्हणून दिल्यास आणि गृह चौकशीत नोंद मिळालेल्यांना रक्ताच्या सगेसोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र तपासणी करून तत्काळ देण्यात येईल. कुणबी जातीची नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्तनातेसंबंधित पुरावे आढळल्यास सदस्याचे शपथपत्र महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, मुक्तजाती, भटक्या जमाती, मागासवर्ग विशेषचे मागासवर्गीय जाती प्रमाणपत्र देण्याचे त्याचे अधिनियम २०१२ नुसार घेवून त्यांनाही तपासून तत्काळ कुणबी जात प्रमाणत्र देण्याचे आदेश देण्यात येईल.

## ४० हजार मतदार करणार लोकसभेला पहिल्यांदाच मतदान

**नगर । वृत्तसंस्था**

आगामी लोकसभा, विधानसभेच्या अनुषंगाने निवडणूक विभागाच्या वतीने मतदारयादी अपडेट करण्याचे काम सध्या सुरू आहे. गेल्या अडीच महिन्यांत राबविलेल्या विशेष मतदार नोंदणी अभियानात ३९ हजार ७२१ नवमतदारांनी नोंदणी केली असून, लोकसभेला ते पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दरम्यान, १ जानेवारी २०२४च्या अर्हता दिनांकावर जिल्ह्याची मतदारसंख्या आता ३६ लाख ११ हजार ३३ एवढी झाली आहे. ती २२ जानेवारीला सर्वत्र प्रसिद्ध केली जाणार आहे. २७ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध झाली होती. त्यावेळी जिल्ह्यात ३५ लाख ७१ हजार ३१२ मतदार होते. तेव्हापासून दोन टप्प्यांत विशेष मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले. त्यात नवीन ३९ हजार ७२१ मतदारांची भर पडून आता जिल्ह्यात ३६ लाख ११ हजार ३३ मतदार झाले आहेत. तृतीयपंथी, देहविक्री करणाऱ्या महिलांसाठी प्रशासनाने विशेष शिबिर राबवून मतदान नोंदणी केले. नव्या मतदारयादीत ११ तृतीयपंथी मतदारांची भर पडून एकूण मतदारसंख्या संख्या १९७ झाली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. इव्हीएम मशिनसाठी तालुक्याच्या ठिकाणी स्ट्राँग रूम उपलब्ध करून ठेवावे. पोलिंग स्टॉपची माहिती तत्काळ कळवावी. निवडणुकीसाठी मास्टर ट्रेनरची प्रत्येक तालुक्यातून पाच नावे कळवावीत. तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता तालुकास्तरावर करून ठेवावी. प्रत्येक मतदार केंद्रावर जाण्यासाठी व परत मशिन घेऊन येण्यासाठी रूट प्लॅन तयार ठेवावा. इव्हीएम मशिनसाठी तालुका ठिकाणी स्ट्राँग रूम उपलब्ध करून ठेवावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित तहसीलदारांना दिलेल्या आहेत. छायाचित्र मतदार याद्यांच्या १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत गेल्या अडीच महिन्यांपासून प्रक्रिया सुरू आहे. यात प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करणे, अंतिम प्रसिद्धीसाठी आयोगाची परवानगी घेणे, मतदार यादी डाटा बेसचे अद्ययावतीकरण आणि पुरवणी मतदार याद्यांची छपाई करणे ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर २२ जानेवारी २०२४ रोजी सर्व मतदान केंद्रांवर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

## वन क्षेत्र अबाधित ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

संपुर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ इतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे. वनक्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट येत आहे मात्र वनक्षेत्र आणि हरितक्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा जिल्हा प्रशासन ठोस भुमिका घेत नाही यांच्या निषेधार्थ तसेच नगररोडवरील शासकीय कार्यालयासमोरील संरक्षण भिंतींच्या आतील रस्ता कामास अडथळा न करणारी अनावश्यक वृक्षतोड थांबवावी, वन विभागातील १० कोटी ८४ लाख गैरव्यवहार प्रकरणी तसेच सह्याद्री देवराई जळीत कांड तसेच अवैध बेसुमार वृक्षतोड प्रकरणी कठोर कारवाई करण्यात यावी आणि जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनकर्त्यांना निवारा शेड उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१६ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन स्थळी ग्रीन शेडनेट तयार करुन फुलांचे तोरण बांधून श्रीफळ फोडुन जिल्हा प्रशासनाला भेट देऊन झाडे लावा झाडे जगवा लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते,नागरीक संघटना तसेच पिडीत विविध मागण्यांना घेऊन आंदोलने, निदर्शने, उपोषण करतात.प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काही आंदोलने आठवडाभर अथवा त्यापेक्षा जास्त दिवस चालतात. सध्या होत असलेल्या वृक्षतोडीमुळे त्यांचा निवारा हिरावला असुन उन्हाळ्यात अडचणींचा सामना करावा लागणार आहे त्यामुळे त्यांच्यासाठी निवारा शेड उपलब्ध करून देण्यात यावे. बीड शहरातील नगररोड वरील जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, पंचायत समिती, तहसिल,न्यायालय कार्यालयासमोर रस्त्यांच्या दोन्ही बाजुंनी असलेली हिरवीगार महाकाय वृक्ष रस्ता कामास अडथळा येत नसतानाही संरक्षण भिंतींच्या आतील झाडांची वृक्षतोड होत असुन तातडीने थांबविण्यात यावी.तसेच रस्ते कामासाठी झाडे तोडल्यानंतर पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून कोणती योजना आखण्यात आली याची माहिती वृक्षप्रेमींना द्यावी. बीड जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०१९-२० आणि सन २०२०-२१ वन विभागाला दिलेल्या १० कोटी ८४ लाख गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य सुत्रधार तत्कालीन विभागीय वन अधिकारी मधुकर तेलंग, वनपरिक्षेत्र अधिकारी मुंडे, मुंडे, शिंदे, सिरसट,पठाण तसेच वनपाल डी.एस.मोरे, लांडगे, बहिरवाळ, वरवडे, कस्तुरे, फुंदे,धसे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येऊन अपहारीत रक्कम शासकीय तिजोरीत जमा करावी. बीड तालुक्यातील पालवण शिवारातील सह्याद्री देवराई वनप्रकल्पात गेल्या वर्षभरात ३ वेळा जळीत कांडाच्या घटना घडलेल्या आहेत.वनप्रकल्पातील गैरव्यवहार प्रकरणातील पुरावे नष्ट करून भ्रष्टाचार दडपण्यासाठी जळीत कांड केल्याचा संशय असुन संबंधित प्रकरणात उच्च स्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. बीड जिल्ह्यात वृक्षतोड बंदी असतानाही वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असुन संबंधित प्रकरणी ठोस कारवाई करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे.

### क वर्ग सहकारी संस्थांचे निवडणुक कार्यक्रम

**श्री एम.एल.देशपांडे निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रे-२ सलग्न कार्यालय सहायक निबंधक सहकारी संस्था ता.गेवराई जि.बीड**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशन पत्रे मिळतील ती जागा) | मिळालेल्या नामनिर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्राच्या यादीचा प्रसिध्दीचा दिनांक | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ | निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिध्दी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल तो दिनांक ती वेळ व ते ठिकाण | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | जनहित महिला अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. गेवराई ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.१७/०१/२०२४ ते दि.२३/०१/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२३/०१/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२४/०१/२०२४ सकाळी ११.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ ते ०८/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०९/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१७/०२/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१७/०२/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१७/०२/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |
| २ | जनकल्याण महिला अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. गेवराई ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.१७/०१/२०२४ ते दि.२३/०१/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२३/०१/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२४/०१/२०२४ दुपारी १.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ ते ०८/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०९/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१८/०२/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१८/०२/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१८/०२/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |

**वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.गेवराई , जि.बीड, छत्रपती संभाजी राजे व्यापारी संकुल, पाहिला मजला , बॅक ऑफ इंडीया व आय.सी.आय.सी.आय बँकेच्या शेजारी, मोंढा नाका, बीड रोड गेवराई ता.गेवराई जि.बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसुचिमधील क्र.०३, क्र.०४ व क्र.०७ मधील कामकाज शासकिय सुटीचे दिवस वगळुन होईल.**

**स्वाक्षरीत**
**(एम.एल.देशपांडे )**
**निवडणुक निर्णय अधिकारी**

### क वर्ग सहकारी संस्थांचे निवडणुक कार्यक्रम

**श्रीमती एस.एस.कदम , निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहायक निबंधक कार्यालय सहायक निबंधक सहकारी संस्था ता.गेवराई जि.बीड**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशन पत्रे मिळतील ती जागा) | मिळालेल्या नामनिर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्राच्या यादीचा प्रसिध्दीचा दिनांक | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ | निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिध्दी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल तो दिनांक ती वेळ व ते ठिकाण | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | शिवकेशर महिला अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. गेवराई ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.१७/०१/२०२४ ते दि.२३/०१/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२३/०१/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२४/०१/२०२४ सकाळी ११.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ ते ०८/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०९/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१७/०२/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१७/०२/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१७/०२/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |
| २ | देवगिरी अर्बन महिला को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. गेवराई ता.गेवराई जि.बीड | १) सर्वसाधारण (०६)<br>२)अनुसूचित जाती/ जमाती (०१)<br>३)महिला राखीव (०२)<br>४)इतर मागासप्रवर्ग (०१)<br>५)वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. (०१)<br>एकुण (११) | दि.१७/०१/२०२४ ते दि.२३/०१/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२३/०१/२०२४ सायं.५.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२४/०१/२०२४ दुपारी १.०० वा. पासुन छननी संपेपर्यत ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.२५/०१/२०२४ ते ०८/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०९/०२/२०२४ सकाळी ११.०० वा. ( निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ) | दि.१८/०२/२०२४ रोजी स.०८.०० ते दु.४.०० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१८/०२/२०२४ दु.४.३० वाजेपर्यत स्थळ- संस्थेचे कार्यालय | दि.१८/०२/२०२४ मतमोजणी नंतर लगेचच स्थळ- संस्थेचे कार्यालय |

**वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.गेवराई , जि.बीड, छत्रपती संभाजी राजे व्यापारी संकुल, पाहिला मजला , बॅक ऑफ इंडीया व आय.सी.आय.सी.आय बँकेच्या शेजारी, मोंढा नाका, बीड रोड गेवराई ता.गेवराई जि.बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसुचिमधील क्र.०३, क्र.०४ व क्र.०७ मधील कामकाज शासकिय सुटीचे दिवस वगळुन होईल.**


**स्वाक्षरीत**
**(एस.एस.कदम)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**

# शिवसंग्राम लोकसभा-विधानसभेच्या जागा लढवणार -डॉ.ज्योती मेटे



**बीड । प्रतिनिधी**

महायुतीचा घटक पक्ष असलेला शिवसंग्राम पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीत तीन, तर विधानसभा निवडणुकीत बारा जागांसाठी आग्रही आहे, अशी माहिती शिवसंग्राम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांनी दिली. आगामी काळातील निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर आणि संघटन बांधणीसाठी शिवसंग्राम महाराष्ट्र प्रदेश राज्यस्तरीय पदाधिकारी मार्गदर्शन शिबिर पार पडले. त्यानंतर ते पत्रकाराशी बोलत होते. तानाजी शिंदे म्हणाले, महायुतीमध्ये शिवसंग्राम हा भारतीय जनता पक्षाचा घटक पक्ष आहे. गेल्यावेळी शिवसंग्राम पक्षाने लोकसभा निवडणूक लढवली नव्हती. मात्र या वेळेला शिवसंग्रामने लोकसभेच्या तीन जागांवर तयारी सुरू केलेली आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत शिवसंग्राम पक्षाचे गेल्यावेळी दोन आमदार निवडून आले होते. या वेळेला शिवसंग्राम पक्ष विधानसभेच्या बारा जागांसाठी आग्रही आहे. भारतीय जनता पक्षाकडून महायुतीमध्ये आम्हाला योग्य तो सन्मान मिळेल. तसेच लोकसभा व विधानसभा निवडणुकीत अपेक्षित जागा मिळतील, असा विश्वास आहे. मेटे साहेबांच्या नेतृत्वात मराठा आंदोलन झाले होते. तेव्हा आरक्षणदेखील मिळाले होते. आताही मराठा आरक्षणासाठी शिवसंग्राम पक्षाची तीच भूमिका आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आंदोलनात



आम्ही पाठीशी आहोत. छगन भुजबळ यांच्या भूमिकेबाबत त्यांचा पक्ष निर्णय घेईल. पण ज्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले आहे, त्यांना ओबीसींमधून आरक्षण मिळायला हवे. सात वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन होऊनही शिवस्मारक अडकलेले आहे. शिवस्मारक लवकरात लवकर उभारण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरु असल्याचे शिंदे यांनी सांगितले. डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या, शिवसंग्राम संघटना ही आपल्यासारख्या मावळ्यांच्या जीवावर पुढे वाटचाल करणार आहे. शिवसंग्राम संपवण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. परंतु शिवसंग्राम कधीही संपणार नाही. येणाऱ्या काळात आपल्याला संघर्ष करावा लागेल.

## मराठा-कुणबी प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयात प्रक्रिया

**बीड । प्रतिनिधी**

कुणबी/मराठा-कुणबी/कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र हवे असेल अशा व्यक्तींनी जात प्रमाणपत्राबाबतचा अर्ज भरून, आवश्यक पुराव्यांसह नजीकच्या महा-ई-सेवा केंद्राकडे दाखल करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

मराठा आरक्षण

बीड जिल्हयामध्ये अभिलेख्यांच्या तपासणीअंती कुणबी-मराठा, मराठा-कुणबी व कुणबी ईत्यादी नोंदी आढळून आलेले मराठी भाषेतील अभिलेखे तसेच सदर अभिलेख्यांमधील मोडी, उर्दू भाषेतील अभिलेखे ही मराठी भाषेत भाषांतरीत करुन जिल्हयाच्या beed.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन नागरीकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर अभिलेख्यांची गावनिहाय, विभागनिहाय, अभिलेख प्रकार निहाय व व्यक्ती निहाय नोंदींची यादी संबंधीत तहसीलदार यांच्यामार्फत करण्यात येत असून सदर यादी गावाच्या ग्रामपंचायतीच्या व तलाठी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी ज्या पात्र व्यक्तीस कुणबी/मराठा-कुणबी/कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र हवे असेल अशा व्यक्तींनी जात प्रमाणपत्राबाबतचा अर्ज भरून, आवश्यक पुराव्यांसह नजीकच्या महा-ई-सेवा केंद्राकडे दाखल करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# नोकर भरतीमधील अनागोंदी कारभारामुळे कार्यालयावर मोर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

डेमोक्रेटीक युथ फेडरेशन ऑफ इंडिया या युवक संघटनेच्या वतीने आज दुपारी एक वाजता अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. तलाठी भरती मधील गैरव्यवहाराची एसआयटी मार्फत चौकशी करा. तलाठी भरती मध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषीवर कठोर कार्यवाही करा.सरकारी नोकरीचे खाजगीकरण,कंत्राटीकरण बंद करा. सर्व विभागातील रिक्त जागा त्वरित भरा यासह बेरोजगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन यावेळी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले. डेमोक्रेटीक युथ फेडरेशन ऑफ इंडिया संघटनेच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.यामधे राज्यातील तलाठी भरती मधील गैरव्यवहाराची एसआयटी मार्फत चौकशी करा. तलाठी भरती मध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषीवर कठोर कार्यवाही करा. सर्व विभागातील रिक्त जागांवर कायमस्वरूपी नौकरभरती करा. खाजगीकरण, कंत्राटीकरण बंद करा. या व इतर प्रमुख मागण्यांसाठी डीवायएफआय या युवक संघटनेने पुढाकार घेऊन विद्यार्थी, युवकांना एकत्र करून अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. व आपल्या मागण्यांचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले. हा मोर्चा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून निघून उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या होत्या मागण्या : - तलाठी भरती मधील गैरव्यवहाराची एसआयटी मार्फत चौकशी करा. - तलाठी भरती मध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषीवर कठोर कार्यवाही करा. - सरकारी नौकऱ्यांचे खाजगीकरण, कंत्राटीकरण बंद करा. - राज्यातील सर्व विभागातील हजारो रिक्त जागा त्वरीत भरा. -परिक्षेसाठी बेसुमार आकारली जाणारी परीक्षा शुल्क १०० /- रुपये पेक्षा जास्त आकारू नये. -बेरोजगार तरुणांना दरमहा ५०००/- रु. बेरोजगार भत्ता सुरू करावा. -चझडउ सारख्या सरकारी यंत्रणे मार्फतच शिक्षक, आरोग्य, लिपीक व महसूल सह सर्व विभागातील भरती करण्यात यावी. - ३४ हजार शिक्षक भरती प्रक्रीया त्वरीत सुरू करा. -रोड रोमियोंना आळा घाला व महिला मुलींना सुरक्षित करा - शहरातील अवैध धंदे बंद करा. या मागण्या करण्यात आल्या आहे.

## आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण महत्वाचे

**बीड । प्रतिनिधी**

नैसर्गिक मानवनिर्मित अनावधानाने झालेल्या दुर्घटना टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण महत्वाचे असून स्थानिक यंत्रणेसह नागरिकांनी असे प्रशिक्षण शिकुन घ्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी आज येथे केले. के.एस.के महाविद्यालयामध्ये भूकंप आल्यावेळी स्थानिकांनी कशा पध्दतीचे उपाय योजना आखावी, यंत्रणेने आपली जबाबदारी कशी पार पाडावी याबाबतची मॉक ड्रील आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. 'मॉक ड्रील' दरम्यान के. एस. के. महाविद्यालयामध्ये भुकंप आल्याने काही विद्यार्थी त्यात अडकल्याचे चित्र निर्माण करण्यात आले यावेळी प्राचार्य यांनी समयसूचकता दाखवून स्थानिक जिल्हा प्रशासनाला दूरध्वनी केला ते पोहचेपर्यंत त्यांना शक्य असणाऱ्या उपाययोजना असून अपघातग्रस्त विद्यार्थ्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. जिल्हा प्रशासनाला माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाना, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पोलीस, तालुका प्रशासन आग्निशामक,शिक्षण विभाग, उर्जा विकास माहिती विभाग यांच्याशी संपर्क साधून समन्वय घडवून आणून के. एस. के. महाविद्यालयामध्ये घडलेल्या ठिकाणी लोकांची गर्दी जमणार नाही, असामाजिक तत्व यासाठी यंत्रणा सज्ज केली आपत्ती व्यवस्थापन, राज्य आपत्ती व्यवस्थापन, केंद्र सरकारचे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन जी मदत करते शक्य होईल ते करण्याचे प्रयत्न करुन कमीत कमी अपघातग्रस्त आणि संवेदनशील वातावरणाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न केल्याचे 'मॉक ड्रील' व्दारे दाखविण्यात आले. 'मॉक ड्रील'होण्याआधी सोमवारी याविषयी तात्विक बाजू समजून घेण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाकडून कार्यशाळा घेण्यात आली होती. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आपतकालीन प्रशिक्षण आयोजित केले होते. एनडीआरएफचे निरीक्षक योगेशकुमार आणि सुजितकुमार पासवान यांच्या टीमने के. एस. के. महाविद्यालयाच्या प्रागंणात विविध यंत्राच्या माध्यमातुन भुंकप, महापूर, अचानक लागलेली आग आणि अपतकालीन परिस्थितीत अडकलेल्या जिवीत व मृत व्यक्तीला तसेच प्राप्त परिस्थितीत आपल्या जवळील उपलब्ध साहित्याचा कशाप्रकारे उपयोग करुन त्या व्यक्तीला आपतकालीन परिस्थितीत सुरक्षित बाहेर काढायचे, एकटे असेल तर स्वत:चा बचाव कसा करायचा याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. यावेळी उपस्थित नागरिकांनी उत्स्फुर्तपणे या प्रशिक्षणाला प्रतिसाद दिला.

## विकासासाठी कटिबद्ध -आ.सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**



मतदार संघातील लोकसंख्येने सर्वात मोठे असलेले पाथरूड गाव कायम माझ्या पाठीशी खंबीरपणाने उभे असते मला भरभरून मतदान रुपी आशीर्वाद देत असल्याने पात्रुडच्या सर्वांगीण विकासासाठी मी कायम कटिबद्ध असल्याचा आमदार प्रकाश सोळंके यांनी म्हटले आहे. पात्रुड येथील उर्दू दारूलूम मदरसा या ठिकाणी आमदार फंडातून वीस लक्ष रुपये रस्ता कामासाठी दिले असून, गावातील मारुती मंदिर या ठिकाणी दहा लक्ष रुपये तर ग्रामपंचायत तिचा ५० लाख रुपयांचा निधी कामाचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी ते बोलत होते पुढे बोलताना आमदार सोळंके म्हणाले की येणारा काळा हा महायुतीच्या नेतृत्वाखाली होणार आहे महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व अजित दादा यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका होणार असल्याने कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागण्याचे ही सुतोवाच त्यांनी केले आहे.

# ज्ञानराधाचे सुरेश कुटे व साईराम अर्बनच्या विरोधात आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव व साईराम अर्बन बँकेचे चेअरमन यांच्या दारासमोर ठेवीदारांच्या ठेवी तात्काळ परत देण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत ठेवीदारांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. आमच्या हक्काचे ठेवी परत करा म्हणत महाराष्ट्र निर्माण सेनेन सह ठेवीदारांनी आंदोलन केले. बीड जिल्ह्यात एकापाठोपाठ एक मल्टीस्टेट बंद होत आहे यामुळे हजारो ठेवीदार आर्थिक संकटात सापडले आहेत. ज्ञानराधा मल्टीस्टेटचे सुरेश कुटे यांच्या व साईराम अर्बन मल्टीस्टेटचे शाहीनाथ परभणे यांच्या दारासमोर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ठेवीदारांच्या ठेवी परत देण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. ज्ञानराधाचे सुरेश कुटे यांच्याकडे तब्बल दोन हजार कोटींच्या ठेवी हजारो ठेवीदारांच्या अडकले आहेत. मागील चार महिन्यापासून ज्ञानराधाचे चेअरमन ठेवी परत देण्याचे आश्वासन देत आहेत. तारीख पे तारीख देत असल्याने ठेवीदार हवालदार झाले आहेत. येत्या २० जानेवारीला ठेवी परत करणार असल्याचे सुरेश कुटे यांनी म्हटले होते. मात्र आता फेब्रुवारी महिन्यात ठेवी परत देणार असल्याचे म्हटले आहे. आर्थिक संकटात सापडलेला ठेविदार हवालदिल झाला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बँकेच्या चेअरमन व संचालकांना जागे करण्यासाठी ज्ञानराधाचे सुरेश कुटे व साईराम अर्बन बँकेचे परभणे त्यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष बादाडे, सुमंत धस,राजेंद्र मोठे, शेतकरी सेनेचे संतोष भाऊ नागरगोजे महिला जिल्हाध्यक्ष कुटे कवठेकर मॅडम, यांच्यासह महाराष्ट्र निर्माण सेनेचे पदाधिकारी व ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यात आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम

**आष्टी । प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम बीड जिल्ह्यातील ६३६ शाळांमध्ये राबविण्यात येत आहे.यामध्ये मुलींनी स्व संरक्षण कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमाचे जिल्हाच्या जिल्हाधिकारी दिपाताई मुधोळ मुंडे यांच्या हस्ते जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अशोकनगर बीड या शाळेमध्ये दि.१५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन होऊन या प्रशिक्षणास सुरुवात झाली आहे. राज्यातील २२ हजार २०१ शाळेमध्ये मुलींना आत्मरक्षणाचे धडे देणे प्रतिकुल परिस्थिती चा सामना करण्यासाठी मुलींना संयम कौशल्यात पारंगत करणे त्यांच्यात आत्मविश्वास व जागृती निर्माण करणे हि काळाची गरज निर्माण झाली आहे.हिंसाचार करणाऱ्यांना संदेश देण्यासाठी, मुली सामना करण्यासाठी तयार आहेत आणि यासंदर्भात मुलींना सर्व पैलूंमध्ये सक्षम करणे याच अनुषंगाने विद्यार्थिनींना गुन्हेगारी विरुद्ध लढण्यासाठी सक्षम करणे हे या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट समोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई ,राज्य प्रकल्प संचालक श्री प्रदीप कुमार डांगे सर यांनी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण हा उपक्रम मुलींना प्रशिक्षण देण्यासाठी राबविण्याची योजिले आहे.

# शेतकरी मेळावा कार्यक्रमाचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विशेष कापूस प्रकल्प' अंतर्गत 'शेतकरी मेळावा' कार्यक्रमाचे आयोजन केंद्राच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मनि यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. उपेंद्र कुलकर्णी (प्रकल्प प्रमुख, दीनदयाल शोध संस्थान बीड) होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर मुंदडा (सामाजिक कार्यकर्ते, अंबाजोगाई), लाड (व्यवस्थापन समिती सदस्य, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर), किर्ती देशपांडे (उद्योजिका, छ. संभाजीनगर), डॉ. अर्जुन तायडे (मुख्य समन्वयक व प्रमुख (पिके) केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर), डॉ. अंगामुथू मनीकंदन (वरिष्ठ मृदा शास्त्रज्ञ, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र), डॉ. प्रल्हाद जायभाये (प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, बदनापूर जि. जालना), डॉ. देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई), डॉ. संजीव बंटेवाड (सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषी महाविद्यालय अंबाजोगाई), डॉ. सूर्यवंशी (विस्तार कृषी विद्यावेत्ता, अंबाजोगाई), डॉ. पाटगावकर (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र खामगाव, गेवराई) यांची उपस्थिती होती. मेळाव्याचे प्रास्ताविक करताना डॉ. देशमुख यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील जमिनीत कापूस महत्त्वाचे पीक आहे. कापसाची उत्पादकता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ५ तालुके व २८ गावांमध्ये अति-सघन लागवड पद्धतीचे तंत्रज्ञान कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येत आहे. अतिसघन लागवड पद्धती तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसार व महिलांना एकत्रित आणून त्यांच्यामध्ये उद्योजकता निर्माण करणे; या उद्देशाने मेळावा आयोजित केला आहे. कृषि विज्ञान केंद्राने तयार केलेल्या 'शेतकरी यशोगाथा' पुस्तिकेचे, 'कापूस सघन लागवड' माहितीपत्रक व 'तूर उत्पादन तंत्रज्ञान' घडीपत्रिकेचे मान्यवरांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. कृषी क्षेत्रातील विविध घटकांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून उल्लेखनीय कार्यासाठी कृषि विज्ञान केंद्राच्या कार्यक्षेत्रातील दहा शेतकऱ्यांना 'भारतरत्न नानाजी देशमुख शेतकरी गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

## शिवा संघटनेच्या पाठपुराव्याला अभूतपूर्व यश

**बीड । प्रतिनिधी**

वीरशैव लिंगायत समाजामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचे प्रमाण असून यामुळे समाजातील तरुणांमध्ये नैराश्य आले आहे. ही गंभीर बाब शिवा संघटनेच्या लक्षात आल्यानंतर जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करुन समाजातील तरुणांना उद्योग व्यवसायाठी कर्ज उपलब्ध करुन देण्याची मागणी वारंवार संघटनेच्या वतीने करण्यात आली. त्यानुसार आज महामंडळाला शासनाने ५० कोटींचा निधी उपलब्ध केला आहे. यामुळे समाजातील बेरोजगारांच्या उद्योग व्यवसायाचा प्रश्न मार्गी लागणार असून बीड जिल्ह्यातील विरशैव लिंगायत समाजातील तरुणांनी उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी जास्ती-जास्त संख्येने प्रस्ताव दाखल करावेत असे आवाहन शिवा संघटनेचे जिल्हाप्रमुख सचिन शहागडकर यांनी केले आहे. वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध प्रश्नांवर आवाज उठविणारी महाराष्ट्रातील एकमेव शिवा संघटना आहे. समाजच्या असंख्य प्रश्नांवर वारंवार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मनोहरराव धोंडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार, उमाकांत शेटे, शिवा संघटनेचे जिल्हाप्रमुख सचिन शहागडकर संघर्ष करत आहेत. आर्थिक परस्थितीमुळे वीरशैव लिंगायत समाजातील तरुणांचे उद्योग व्यवसायातील अत्यअल्प प्रमाण असून परिणामी समाजातील तरुणांमध्ये प्रचंड बेरोजगारीचे प्रमाण वाढल्याने महाराष्ट्रभर शिवा संघटनेच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्याची मागणी जोर धरु लागली. त्यानुसार राज्य शासनाने याचे गांभीर्याने दखल घेत महात्मा बसवेश्वर महामंडळाची स्थापना करुन यंदा महामंडळास ५० कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे जो जन्माने वीरशैव लिंगायत आहे.

# स्वराज्य स्थापनेची संकल्पना राष्ट्रमाता जिजाऊ ची देन आहे

**बीड । प्रतिनिधी**

कोणताही राज्यकारभार हा त्या राज्यातील जनतेच्या भल्या करिता असावयास पाहिजे. १६ व्या शतकातील मासाहेब जिजाऊंच्या काळातील महाराष्ट्रात जनतेवर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत होते. अशावेळी रयतेचे लोक कल्याणकारी स्वराज्य स्थापनेची संकल्पना राष्ट्रमाता जिजाऊ ची अनमोल देण आहे. त्यांच्या प्रेरणेतून छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जाती-धर्मातील मावळ्यांना एकत्रित करून पूर्णत्वास नेली व रयतेचे स्वराज्य स्थापन केले असे खटाने यांनी प्रतिपादन केले. महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने प्रकाश आंबेडकर नगर, बीड येथे आयोजित मासाहेब जिजाऊ यांची व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी सरस्वती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष उत्तमराव पवार हे होते तर अमरसिंह ढाका व रेखाताई खटाने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. सर्वप्रथम तथागतभगवान बुध्द, राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कॅप्टन राजाभाऊ आठवले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष भोले यांनी तर सूत्रसंचालन यांनी केले. त्यानंतर पोस्टमन पतपेढीचे संचालक म्हणून निवड झालेले अमरसिंह ढाका यांचा महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच आदित्य डोंगरे, मंथन धवन, राजरत्न विद्यागर या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनावर उस्फूर्त अशी माहिती दिली. त्यांचा मान्यवराच्या हस्ते वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे तर्फे शालेय साहित्य व राष्ट्रमाता जिजाऊ जीवन चरित्र पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जेष्ठ महिला जरी शैक्षणिक अर्थाने शिकलेल्या नसल्या तरी आपल्या नातवांकडून राष्ट्रमाता जिजाऊ च्या जीवन चरित्राचे सखोल वाचन, चिंतन व मनन करण्याकरिता राष्ट्रमाता यांचे जीवन चरित्र पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.